उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, वर्धा यांच्या मौजा सालोड (हिरापूर) जि. वर्धा येथील कार्यालयाच्या इमारत बांधकामाचे अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह (परिवहन)विभाग
शासन निर्णय क्रमांकः एमव्हीडी-०४१६/प्र.क्र.१९५/परि-४
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: १७ एप्रिल २०१८

वाचा :-

१) परिवहन आयुक्त कार्यालयाचे पत्र क्र. काईबां(३२)/०७११/न.क्र.०१/का.१०(१)/ जा.क्र.१०७४१,दि.२१.०९.२०१५.
२) परिवहन आयुक्त कार्यालयाचे पत्र क्र. काईबां(३२)/०७११/न.क्र.०१/का.१०(१)/ जा.क्र.७६३८,दि.१६.०५.२०१७.
३) मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या दि.१५.०२.२०१८ च्या बैठकीचे इतिवृत्त.

प्रस्तावना:-

जिल्हाधिकारी, वर्धा यांनी दि.०३.११.२०१६ च्या आदेशान्वये मौजा सालोड (हिरापूर) ता.वर्धा,जि.वर्धा येथील सर्व्हे क्र.३२४ मधील ६.०० हेक्टर शासकीय जागा कार्यालयीन इमारत व इतर अनुषंगिक कामे यासाठी सशर्त हस्तांतरीत करण्यास मंजूरी प्रदान केली आहे. त्यानुसार उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, वर्धा यांनी मौजा सालोड (हिरापूर) जि.वर्धा येथे (G+२) कार्यालयीन इमारत बांधकामाकरिता रु.१०९९.८७ लक्ष रकमेचे अंदाजपत्रक शासनाच्या मंजुरीसाठी सादर केले होते. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, वर्धा या कार्यालयाच्या मौजा सालोड (हिरापूर), जि.वर्धा येथील सर्व्हे क्र.३२४ मधील ६.०० हेक्टर शासकीय जागेत कार्यालयीन इमारत बांधकामास रु.११२९.४६ लक्ष इतक्या किंमतीच्या अंदाजपत्रकास व नकाशांना दि.१५.०२.२०१८ रोजी मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत सचिव समितीने सहमती दर्शवली आहे. त्यास अनुसरून सदर कामाच्या रु. ११,२९,४६,३७७/- (रुपये अकरा कोटी एकोणतीस लक्ष शेहेचाळीस हजार तीनशे सत्त्याहत्तर फक्त) किंमतीच्या अंदाजपत्रकास शासन या आदेशाव्दारे प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

अंदाजपत्रकाचा तपशील आणि अटी व शर्ती खालीलप्रमाणे.

Name of the Department : HOME DEPTT.					
Name of Work: Construction of Deputy Regional Transport Office building (G+२) at.Salod (Hirapur), Tah.& Distt.Wardha					
RECAPITULATION SHEET					
Sr.No.	Particulars of item		Norms (unit Rate Rs. per Sqmt./Meter/LumpSum etc.)		Cost Rs.
(A)	ESSENTIAL ITEMS				
१	Building proper Scope				
	(a)Area (Sqmt.)	४८४.३०	२३०००	Per Sqmt.	१,११,३८,९००
	(b)Number of floors	GF			
	(a)Area (Sqmt.)	६५५.४३	२१५०००	Per Sqmt.	१,४०,९१,७४५
	(b)Number of floors	FF			
	(a)Area (Sqmt.)	६५५.४३	२३०००	Per Sqmt.	१,५०,७४,८९०
	(b)Number of floors	FF			
	(c)Foundation in B.C./Weak Soil				
	(d)Cost of Construstion				**४,०३,०५,५३५**
२	**Electrification**	Internal	५% of १(d)		२०,१५,२७७
		External	६% of १(d)		२४,१८,३३२
			Total		**४४,३३,६०९**
३	**Water Supply and Sanitation**		५% - of १ (d)		**२०,१५,२७७**
४	**Miscellaneous Items**				
	Compound Wall & Cate	३८९७	७५००	Per Rmt.	२,९२,२७,५००
	Internal Roads BT & Testing Track	२२००	२१०००	Per Sqmt.	४६,२०,०००
	Internal Roads CC	५००	२८००	Per Rmt.	१४,००,०००
	Furniture	१७९५.१६	२१०००	Per Sqmt.	८९,७५,८००
	Parking Arrangement			Lump Sum	५,००,०००
	Rain Water Harvesting			Lump Sum	५,००,०००
	Fire Fighting Arrangements			Lump Sum	५,००,०००
	Land Development & Gardening			Lump Sum	२०,००,०००
	C.D.Work			Lump Sum.	१०,००,०००
	Anittermite Treatment			Lump Sum	५,००,०००
				Total	**४,९२,२३,३००**
				Sub Total (T) = (१)+(२)+(३)+(४)	**९,५९,७७,७२१**
	Contingencies			४% of १(d)	१६,१२,२२१
	Escalation			१०% of १(T)	९५,९७,७७२
	Service Tax			१५% of ४०% of (T)	५७,५८,६६३
			Sub Total (A)		**११,२९,४६,३७७**
(B)	OPTIONAL ITEMS				
Sr.No	Items				
					०
			Sub Total (B)		०
			TOTAL COST OF PROJECTS (A)+(B)		**११,२९,४६,३७७**
			Say Rs. Lakhs		**१,१२९.४६**

(१) काम सुरू करण्यापूर्वी नमूना नकाशा, मांडणी नकाशा तसेच विस्तृत नकाशास वास्तुविशारदांकडून मंजूरी घेऊनच सुरू करावे.
(२) ढोबळ स्वरुपात धरण्यात आलेल्या तरतूदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक करुनच काम हाती घ्यावे.
(३) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग,शान निर्णय क्र.इएनव्ही-२०१३/ प्र.क्र.१७७/ तां.क.१,दि.१० जानेवारी, २०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.
(४) सदर कामाच्या बांधकामाचा खर्च विभागाने त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या नियतव्ययामधून करण्यात यावा.
(५) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या शासन निर्णय क्र.बीडीजी २०१७/प्र.क्र.६०/इमारती-२, दि.०७.०७.२०१७ अन्वये कार्यवाही करण्यात यावी.

२. यासाठी होणारा खर्च “मागणी क्र.एच,मुख्य लेखाशीर्ष ४०५९ सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च (०८) परिवहन (०८)(१२) मोंठी बांधकामे योजनांतर्गत (४०५९ ०८२३)- ५३ मोठी बांधकामे या लेखाशीर्षाखाली मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.”

३. सदर शासन निर्णय वित्तीय अधिकार नियम पुस्तिका,१९७८ भाग-पहिला, उपविभाग-५, अनुक्रमांक १, महाराष्ट्र सा.बां.नियम पुस्तिकेतील परिच्छेद क्रमांक १३४ नुसार तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.५१६/इमा-२,दि.०१.०६.२०१७ तसेच अनौप-१२८/इमा-१, दि.१५.०२.२०१८ अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४१७१५३९३६५९२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kadam Dattatray Hanmant

Digitally signed by Kadam Dattatray Hanmant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=7fee1bbc15b71aa23bf3ffa4e468df7492703428e9ad65c6cd79299927331e6f, cn=Kadam Dattatray Hanmant
Date: 2018.04.17 15:42:53 +05'30'

(द.ह.कदम)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव
३. मा.राज्यमंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव

४. महालेखापाल (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, १/२, मुंबई /नागपूर
५. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
६. परिवहन उप आयुक्त (प्रशासन/संगणक/लेखा), परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई
७. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, वर्धा
८. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१०.जिल्हा कोषागार अधिकारी, वर्धा
११.उप सचिव (इमा) सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
१२.अवर सचिव (बीयुडी-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
१३.निवडनस्ती (परि-४)